SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX – (0231) 2609000, 2609089
FAX : 0091-0231-2691533, 2692333, 2693294

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९२३३३, २६९३२९४.
Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

Re-accredited By
NAAC (2014)
With CGPA - 3.16

जा.क्र. संलग्नता/टे.१/युजीके/ No 1356 दिनांक :- 12 MAR 2015

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्न कला, वाणिज्य, विज्ञान,
शिक्षणशास्त्र, विधी, व शा. शिक्षण महाविद्यालये

**विषय:- महाविद्यालयीन शिक्षकांच्या स्थाननिश्चितीबाबत.**

**संदर्भ :- जा.क्र. संलग्नता/टे.१/वंगार/६५ दि. ३०/०६/२०१४ चे या कार्यालयाचे पत्र**

महोदय/महोदया,

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार महाविद्यालयातील शिक्षकांची वरिष्ठ/निवडश्रेणीत तसेच सहाय्यक प्राध्यापक स्टेज २ (एजीपी ७०००) व स्टेज ३ (एजीपी ८०००) मध्ये स्थाननिश्चिती करण्यासाठी ज्या शिक्षकांनी प्रस्ताव सादर केले आहेत त्यांची स्थाननिश्चिती करण्यासाठी दि. २४/०३/२०१५ ते २६/०३/२०१५ या कालावधीत विद्यापीठ कार्यालयात स्थाननिश्चिती शिबिराचे आयोजन केले आहे. (सोबत स्थाननिश्चिती शिबीराचे वेळापत्रक जोडले आहे.) त्यानुसार नियोजित वेळेत व नियोजित ठिकाणी आपण संबंधित शिक्षकांसह शिबीरासाठी उपस्थित राहावे.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, ज्या शिक्षकांचे प्रस्ताव (दि. ३०/०९/२०१४ अखेर) स्थाननिश्चितीसाठी विद्यापीठ कार्यालयाकडे पाठवले आहेत. अशा शिक्षकांचे चार स्वतंत्र प्रस्ताव (मुळ कागदपत्रांची एक फाईल आणि संबंधित शिक्षकाचे सेवापुस्तक अद्ययावत नोंदीसह) कामकाजाच्या सोयीसाठी शिबीरास येताना बरोबर घेवून यावेत ही विनंती.

आपणास विद्यापीठ नियमानुसार प्रवासभत्ता व मानधन देण्यात येईल. तसेच संबंधित शिक्षकांना शिबीरासाठी स्वखर्चाने उपस्थित राहण्याबाबत कळवावे.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
संलग्नता विभाग

सोबत :- स्थाननिश्चिती शिबीराचे वेळापत्रक

टीप :- **उपरोक्त संदर्भीय दि. ३०/०६/२०१४ च्या पत्रानुसार विद्यापीठास सादर केलेल्या शिक्षकांच्या प्रस्तावांचीच स्थाननिश्चिती या शिबीरामध्ये करण्यात येणार आहे.**

**दि. १९/०९/१९९१ ते ०३/०४/२००० या कालावधीतील शिक्षकांची स्थाननिश्चिती करण्यासाठी पाठवलेल्या प्रस्तावांचा या स्थाननिश्चिती शिबीरामध्ये समावेश केलेला नाही. त्यांचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**महाविद्यालयीन शिक्षकांच्या स्थाननिश्चिती शिबीराचे वेळापत्रक**

**स्थळ :-** वि. स. खांडेकर सभागृह, भाषाभवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**दिनांक :-** २४/०३/२०१५ ते २६/०३/२०१५ **वेळ :-** सकाळी ११.०० वाजता

| विद्याशाखा | विषय | कोल्हापूर जिल्हा | सांगली जिल्हा | सातारा जिल्हा |
|---|---|---|---|---|
| कला व ललितकला विद्याशाखा | मराठी | २४/०३/२०१५ | २५/०३/२०१५ | २६/०३/२०१५ |
| | इंग्रजी | | | |
| | हिंदी | | | |

| विद्याशाखा | विषय | कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा |
|---|---|---|
| वाणिज्य विद्याशाखा | अकौटन्सी | २४/०३/२०१५ |
| | कॉमर्स | |

| विद्याशाखा | विषय | कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा |
|---|---|---|
| शिक्षणशास्त्र विद्याशाखा | शिक्षणशास्त्र | २४/०३/२०१५ |
| | शारिरीक शिक्षण | |

| विद्याशाखा | विषय | कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा |
|---|---|---|
| विधी विद्याशाखा | विधी | २४/०३/२०१५ |

| विद्याशाखा | विषय | कोल्हापूर | सांगली | सातारा |
|---|---|---|---|---|
| विज्ञान विद्याशाखा | रसायनशास्त्र | २४/०३/२०१५ | २५/०३/२०१५ | २६/०३/२०१५ |
| | | कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा | | |
| | पदार्थविज्ञान | २५/०३/२०१५ | | |
| | प्राणिशास्त्र | | | |
| | वनस्पतीशास्त्र | | | |
| | भूगोल | | | |
| | संख्याशास्त्र | | | |
| | गणित | | | |

| विद्याशाखा | विषय | कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा |
|---|---|---|
| सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | अर्थशास्त्र | २६/०३/२०१५ |
| | राज्यशास्त्र | |
| | समाजशास्त्र | |
| | मानसशास्त्र | |
| | समाजकार्य | |
| | ग्रंथालय | |
| | इतिहास | |

- **महाविद्यालयीन शिक्षकांची स्थाननिश्चिती शिबीराचे आयोजन विद्याशाखानिहाय करण्यात आले असून सर्व संबंधित शिक्षकांनी त्यांच्या विषयासमोर दर्शविलेल्या तारखांना सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ कार्यालयात स्वखर्चाने हजर राहावे.**

उपकुलसचिव,
संलग्नता विभाग